फौ.कि.अर्ज क्र.१४४/२०२१
हरिचन्द्र .वि. ग्रामपंचायत
नि.क्र. १०च्या पुढे

अर्जदारातर्फे साक्षदार क्रमांक १ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
नाव – हरिचन्द्र भिवा कोकोडे,
वय – ५१ वर्ष, व्यवसाय – मजुरी,
राहणार – पिपरी, ता. मौदा,जिल्हा – नागपूर

सरतपास शपथेवर अर्जदारातर्फे ॲड. श्री. एम.जी.आकरे द्वारा

माझे सरतपासासाठी दाखल केलेल्या प्रतिज्ञाप्रत्रातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला असुन तो मी वाचुन पाहला व त्यावर मी सही केली आहे. मी प्रकरणामध्ये माझे वडील भिवा कोकोडे यांचे मृत्यूची नोंद गैरअर्जदार यांचेकडे नसल्याबाबत गैरअर्जदार यांनी दिलेले प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यास **निशानी क्रमांक १२** देण्यात येते. तसेच माझे आधार कार्ड क्रमांक ६२७१८१७०४२०३ याची छायांकित प्रत प्रकरणात दाखल केली असुन मुळ आधार कार्ड आज रोजी न्यायालयात सोबत आणले आहे. प्रकरणात दाखल आधार कार्डची छायांकित प्रतीतील मजकुर सोबत आणलेल्या मुळ आधार कार्डमधील मजकुराशी पडताळुन पाहला असता बरोबर असल्याने त्यास **निशानी क्रमांक १३** देण्यात येते. तसेच माझे वडीलांचे मृत्यू दिनांक हरकत घेण्यासाठी मी दिनांक १.१०.२०२१ दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्रात जाहीर नोटीस दिली होती. त्याची प्रत प्रकरणात दाखल आहे. त्यास **निशानी क्रमांक १४** देण्यात येते.

श्रवणोत्तर स्वीकृत.

मौदा.
दिनांक ०९.०३.२०२२

(एस.पी वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा

नि.क्र. १०च्या पुढे